प्रियदर्शन सहस्रबुद्धे मूळचा पुण्याचा,
शिकला आय.आय.टी. पवईला - मेकॅनिकल इंजिनिअरिंग मध्ये बी.टेक व एम.टेक



सध्या तो निर्माण फेलोशिप अंतर्गत गडचिरोलीत राहतो आहे व तिथल्या ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे चांगल्या व कार्यक्षम प्रकारे कशी राबवता येतील यासाठी प्रयत्न करतो आहे. सोबतच स्वत: पर्यावरणाशी सुसंगत व मैत्रीपूर्ण पद्धतीने कसा जगू शकतो याचा देखील तो शोध घेतो आहे.





# माझा निर्माण प्रवास

निर्माणचे तिसरे शिबीर जून 2007 मध्ये झाले. त्यानंतर आय. आय. टी. मधले शेवटचे वर्ष सुरू झाले. पुढे काय करणार याबद्दल आता निर्णय घेणे गरजेचे झाले होते. मी पुढे जीवनात हे करीन किंवा मला हे बनायचे आहे असे काहीच स्वप्न मी पाहिले नव्हते. त्यामुळे पाटी कोरी होती. निसर्गासोबत, निसर्गाचा एक भाग बनून जगायचे हा विचार पक्का झाला होता. म्हणून औपचारिक शिक्षण झाल्यानंतर काहीच करायचे नाही (म्हणजे



प्रचलित व्यवस्थेत ज्या गोष्टी करण्याला 'करणे' म्हणतात अशा) असा विचार मी केला. आमच्या शेतावर जाऊन रहायचे, भरपूर संगीत रियाज करायचा... मी हा विचार आई बाबांना सांगितला. या निर्णयाला आई बाबा मुळीच सहमत नव्हते. अगदी विरोध होता असे नाही. असा आई बाबांशी मतभेद होण्याचा माझ्यासाठी पहिलाच अनुभव होता.

हे नाही करता येणार म्हणून मग माझी वेगळी चक्र चालू झाली. मग पुढे शिकावे असे ठरवले. त्यासाठी गरजेच्या परीक्षा दिल्या. एम. एस. करावे की पीएच.डी. हे



ठरवण्यात वेळ गेला. विषय ऊर्जे संबंधित, शाश्वत जीवनशैली असा असेल हे ठरवले होते. पण मग असा विचार केला की जसे आत्ता मला काय करू असा प्रश्न पडत आहे तोच प्रश्न मला हे शिक्षण घेतल्यानंतर पडेल. म्हणजे मी जिथे आहे तिथेच असेन फक्त काही नवीन ज्ञानाचे आणि अनुभवाचे ओझे वाहत असेन आणि वयानी चार पाच वर्षे मोठा असेन. आय. आय. टी. मधली चार वर्ष ही शैक्षणिक दृष्ट्या फार काही आनन्ददायी नव्हती. आळस हे जरी त्याचे एक महत्त्वाचे कारण असले तरी असे ही अनेकदा घडले आहे जेव्हा मी प्रयत्नपूर्वक काहीतरी शिकायचा प्रयत्न केला आहे पण शिक्षक, मित्रांकडून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे कंटाळून गेलो. त्यामुळे अनेक गोष्टी

मला समजल्याच नाही. मी जे शिकलो ते वापरून काही करू शकेन असा आत्मविश्वासही नव्हता. त्यामुळे पुढे शिकून फार काही हाती लागणार नाही असे वाटले आणि हा विचार बाजूला ठेवला.

मग आता काय? चक्रातले पुढचे स्टेशन म्हणजे नोकरी करूयात. आय. आय. टी. मधे प्लेसमेंट साठी अनेक कंपन्या येतात. त्या प्रक्रियेत सहभागी होऊन नोकरी मिळवावी आणि काही काळ नोकरी करावी असा विचार केला. मग पुढचे पुढे बघू... कंपन्या आधी येऊन प्री प्लेसमेंट टॉक्स देतात. या दरम्यान या बहुतांशी कंपन्याचे जे प्रतिनिधी आले होते त्यांच्या मांडणीत फारच उथळपणा जाणवला. पैशाची लालुच दाखवून हुशार मुलांना आपल्याकडे आकर्षित करणे हाच त्यांचा उद्देश. खरंच काही अर्थपूर्ण काम करतो असे सांगणारी एकही कंपनी दिसली नाही. एका प्रश्नाशी, वास्तवाला भिडून काही बदल घडवून आणण्यासाठी आम्ही काही करतो असे कोणीच सांगू शकले नाही. पैसा हे साध्य अन् त्यासाठी सगळा खटाटोप. या सर्वात मला डिसेंबर 07 मध्ये i2 नावाच्या कंपनीत नोकरी मिळाली. त्यानंतर जानेवारी 08 मध्ये निर्माण 1.4 चे शिबीर झाले. तोपर्यंत मी नोकरी करावी या निर्णयाला आलो होतो. कशासाठी याचे उत्तर नव्हते. फक्त वेळ काढण्यासाठी. दुसरे काही करायला सुचत नाही म्हणून.



निर्माण 1.4 मध्ये फारच महत्त्वाचा बदल घडला. कृतीवर भर दिला गेला. विचार आणि तात्त्विक चर्चेला फाटा देऊन कृती काय करणार हे ठरवायचे होते. कर के देखो!! यामुळे फक्त विचार आणि बोलण्यातून जे धुरकट वातावरण निर्माण होते त्यातून अचानक स्पष्ट वळणं दिसायला लागली. केवढ्यातरी कृती करणे शक्य होते. आपल्याच आजूबाजूला केवढ्यातरी गोष्टी सतत घडत असतात. त्याकडे डोळस पणे पाहिले तर कृतीसाठी मार्ग खुले होतात. आय. आय. टी. मध्ये अशा कृती करायला लागलो. वैयक्तिक पाटळीवर लिफ्ट न वापरणे, गार पाण्यानी आंघोळ हे ऊर्जा वाचवण्यासाठी. बर्ड फ्लू झाल्यामुळे लाखो पक्षी मारले गेले. यासाठी मी मांसाहारी असल्यामुळे मीही जबाबदार आहे म्हणून शाकाहारी बनलो. आमच्या मेस मध्ये बायोगॅस यंत्र बसवण्यासाठी प्रयत्न केला. तेव्हा अनेक झाडे आय. आय. टी.त तोडली गेली. त्याची माहिती RTI चा उपयोग करून मिळवली आणि ती माहिती सर्वांशी शेअर करून लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न



केला. स्पिकमॅके चे काम उत्साहानी केले. यामुळे केवढेतरी शिकत गेलो. जगणे एकदमच बदलले.

या दरम्यान निर्माण फेलोशिप करण्याचा विचार चालू झाला. ग्रामीण भागात एक वर्ष राहून काम करणे हा त्याचा उद्देश. आपल्या देशाचे ग्रामीण वास्तव आपल्याला समजले पाहिजे तोवर आपण पुढे काय करणार हे कसे ठरवू शकू? असा विचार होता आणि म्हणून फेलोशिप मध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय मी स्वत:च घेतला. याच्याबद्दल आई बाबांशी चर्चा केली नाही. त्यांना निर्णय सांगितला.

फेलोशिप च्या सुरुवातीला हा भाबडा विचार होता. फेलोशिप सुरू झाल्यानंतर मात्र



हा विचार जास्त परिपक्व होत गेला आणि तो विचार म्हणजे माझ्या जीवनाला प्रयोजन असायला हवे. असे प्रयोजन जे मला एका व्यापक वास्तवाशी जोडते. जेणेकरून माझ्या अस्तिवाला अर्थ प्राप्त होतो. जीवनाचे प्रयोजन शोधायचे असेल तर व्यापक जीवनाला भिडले पाहिजे. तिथे ते सापडेल असा विश्वास आहे. हे प्रयोजन सापडेपर्यंत शोधायचे. त्याला वेळ मर्यादा नाही. कारण प्रयोजन नसलेले जीवन हे जीवनच नाही. हे प्रयोजन कुठल्या क्षणी सिद्ध होईल सांगता नाही येत. पण शोध आपण बरोबर ठिकाणी घेत असलो म्हणजे झाले.